<u>रे.दि.मु.नं.३२६/२०१९</u>

## निशाणी ४३ खालील आदेश
**(भाऊसाहेब जगताप वगैरे वि. सुभाष खेडेकर वगैरे)**

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र. ७ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठीचा केलेला आहे. वादीच्या कथनानुसार, वादी हे अडाणी असल्याने, त्यांना कायद्याचे पुरेसे ज्ञान नसल्याने तसेच मार्च २०२० ते नोव्हेंबर २०२१ पर्यंत कोव्हीड–१९ संसर्गाचा प्रादुर्भाव असल्यामुळे प्रतिवादी क्र.७ हे मयत असल्याची बाब, त्यांचे वारसांची माहिती व मृत्युचा दाखला वकिलांना वेळेवर देऊ शकले नाहीत. त्यामुळे वारस रेकॉर्डवर घेणेस त्यांना ३ वर्षांचा विलंब झालेला आहे. सदर प्रतिवादी क्र.७ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होवून त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणसाठी परवानगी मिळणे न्यायाचे हिताचे दृष्टीने आवश्यक आहे. अन्यथा यातील वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे.

२. सदर अर्जास प्रतिवादी क्र.५ तर्फे म्हणणे देऊन सदरचा अर्ज खोटा, लबाडीचा असून प्रतिवादी यांना मान्य नाही. वादी यांनी सदरचा अर्ज मुदतीत दाखल केलेला नाही तसेच प्रतिवादी क्र.७ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस जाणीवपुर्वक विलंब केलेला आहे. वादी यांनी विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण दिलेले नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करायचे न्यायालयाचे मत झालेस जास्तीत जास्त खर्चावर मंजुर

करावा.

३. सदरच्या अर्जावर दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकला. यातील प्रतिवादी नं. ७ हे मयत झालेले आहेत. प्रस्तुतचा दावा हा ठराव व निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. परंतु, विलंब माफ केल्याशिवाय प्रतिवादी क्र.१ चे वारस रेकॉर्डवर घेणे शक्य नाही. त्यामुळे ही सर्व परिस्थिती लक्षांत घेता, अर्ज मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज (नि.४३) चा मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.७ चे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ करण्यात येतो.

**सही/-**

**( सौ. एस. के. देशमुख )**

सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, सासवड.

सासवड.

दिनांक २७/०६/२०२३.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Mrs. S. R. Kamble, |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh,<br>Civil Judge, J.D. &<br>J.M.F.C.,Saswad |
| (c) | Date of Judgement /Order | : | 27/06/2023 |
| (d) | Judgement /Order signed by P.O. on | : | 27/06/2023 |
| (e) | Judgement /Order uploaded on | : | 12/07/2023 |